| MHST130016282023 | नि.दि.दावा क्र.४२८/२०२३<br>नंदा देसाई वि. पोपट उदुगडे |
|---|---|

**रे.दि.मु.क्र.४२८/२०२३ मधील निशाणी ३९ वरील आदेश**

सदरहू अर्ज वादीने दाव्यात दुरूस्ती करण्याकरीता झालेला उशीर माफ होवुन दुरुस्ती करुन दाव्याची दुरुस्तीप्रत दाखल करणेस परवानगी मागितली आहे.सदर अर्जास पुरक शपथपत्र देण्यात आलेले आहे. त्यावर प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे.

२. वादीचे विद्वान विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, नि.३८ वरील आदेशाप्रमाणे दाव्याच्या सरनाम्यात प्रतिवादी क्र.१ यांचे नावापुढे "मयत वारस" असे लिहुन त्यांचे वारसांना दाव्यामध्ये सामाविष्ठ करण्याबाबत आदेश पारीत झाला होता व सदरची दुरुस्ती १४ दिवसाच्या आत करावयाची होती. परंतु नजरचुकीने वादीकडुन सदरची दुरुस्ती करणेचे राहुन गेले. त्यामुळे, सदरची दुरुस्ती करुन दुरुस्तप्रत दाखल करण्याठी परवानगी मागितली आहे. सबब, त्यांनी अर्ज मंजूर होवून मिळणेची विनंती केली.

३. अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला. सदरचा दावा हा सरस निरस मानाने वाटप होवुन मिळण्याकरीता दाखल केला आहे. वादीचा दाव्यात दुरुस्ती करण्याबाबत अर्ज याआधीच मंजुर झालेला आहे. त्यामुळे, दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल केल्यास त्यामुळे दाव्यात बदल करणारी नाही. त्यामुळे, सदर अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**– : आ दे श :–**

१) अर्ज (निशाणी ३९) मंजूर करण्यात येतो.

२) वादीने अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रस्तावित दुरूस्ती करुन दाव्याची दुरुस्तप्रत दाखल करावी.

पाटण.
दि. ११/०९/२०२५.

( आर.एम.लोळगे )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पाटण.